CNR NO.MHSO060005862019

**विशेष दिवाणी दावा क्र. ४८/२०१९**

द्रोपदी वाघमोडे

*विरुध्द*

बिरा कोकरे, वगैरे

## निशाणी क्र.५१ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१३ ने कैफियतीमध्ये दुरुस्तीकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१३ चे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा वादीने सरससनिरस वाटपासाठी दाखल केलेला आहे. वादीने दाव्यामध्ये मौजे बावची येथील शेतजमिन गट क्र.३७/१ ते ३७/४ या समाविष्ठ केलेल्या नाहीत. सदरील मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या एकत्रीत कुटूंबाच्या आहेत. त्यामुळे दाव्यास सर्व मिळकती समाविष्ठ न केल्याची बाधा येत आहे. करिता, प्रतिवादीस कैफियतीमध्ये दुरुस्ती करुन सदरील बाब नमूद करणे आहे. करिता, अर्ज मंजूर करण्यात यावा.

२. वादीतर्फे म्हणणे मांडण्यात आले की, सदरील मिळकतीत वादीस हक्क व हिस्सा मागावयाचा नाही. प्रतिवादींना सदर मिळकतीबाबत पूर्वीपासून माहिती होती. सदर मिळकतीचे पूर्वीच वाटप झालेले आहे. केवळ कामकाज लांबविण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. करिता, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. दाव्यामध्ये वादीने पुरावा नोंदविलेला आहे. प्रकरण प्रतिवादींच्या पुराव्यासाठी प्रलंबित आहे. दावा सरससनिरस वाटपासाठी दाखल करण्यात आलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादींना अधिकचा बचाव घेण्याची संधी देणे योग्य होईल. त्यायोगे वादीस देखील सदरील मिळकतींबाबत त्याचे म्हणणे लेखी स्वरुपात दाव्यात मांडता येईल. करिता, दाव्याचे स्वरुप पाहता पुढील आदेश.

## आदेश

१. अर्ज खर्च रक्कम रु.७००/– वर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने प्रस्तावित दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करुन दुरुस्त

कैफियतची प्रत दाखल करावी.

(खुल्या न्यायालयात घोषीत.)

NILESH SUBHASH BUDRUK

Digitally signed by NILESH SUBHASH BUDRUK
Date: 2024.12.16 17:26:21 +0530

दिनांक : १३.१२.२०२४

(नीलेश सु. बुद्रुक)
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर क्र. २,
पंढरपूर.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | $2^{nd}$ Jt. Civil Judge (S.D.), Pandharpur. |
| (c) | Signed by P.O. On | : | 16.12.2024 |
| (d) | Uploaded on | : | 16.12.2024 |